


**‘अ’ने इंटरनेटर अपलोड केलेला मजकूर ‘ब’ला आक्षेपार्ह वाटला; तर त्या आक्षेपाची खातरजमा न करताच तो तत्काळ आपल्या संकेतस्थळावरून ‘स्वयंशिस्ती’ने काढून टाकण्यासाठी इंटरनेट कंपन्यांवर दबाव आणू पाहणारे सरकार ‘स्वातंत्र्या’चा गळा घोटायला निघाले आहे का?**

# मागच्या दाराने मुस्कटदाबी

## इंटरनेटच्या गळ्याला तात लावू पाहणाऱ्या अनावश्यक हस्तक्षेपाला विरोध

**प्राणेश प्रकाश**
सेंटर फॉर इंटरनेट सोसायटी, बंगळुरु

माहितीच्या महाजालाने जगाच्या सीमारेषा पुसट केल्या, या आभासी जगाने संवादाची प्रक्रिया आणि व्यासपीठेच बदलून टाकली. इंटरनेटसारखे एखादे माध्यम आपल्या हाताशी असेल, असे कधीही कुणालाही वाटले नव्हते; पण जगाला सर्वार्थाने जवळ आणणारे माध्यम निर्माण झाले, विकसित झाले. आज ते आपल्या जगण्याचा एक महत्त्वाचा भाग होऊन बसले आहे. आज उपलब्ध असलेल्या विविध माध्यमांमध्ये हे एकमेव असे माध्यम आहे, ज्या माध्यमातून कुणीही स्वतःचे विचार क्षणभरात थेट कोट्यवधी लोकांपर्यंत पोहोचवू शकतो. प्रथितयश वृत्तपत्रांच्या पानांवर एरवी ज्यांना कधीही जागा मिळाली नसती, असे कितीतरी जण आज स्वतःचे विचार ब्लॉग्जच्या माध्यमातून जगापर्यंत पोहोचवत आहेत. रूढ माध्यमांनी नाकारलेले संपादित अगर दुर्लक्षित अगणित विचार आज जगापर्यंत पोचू शकतात. कारण फक्त एकच, माहितीच्या महाजालामध्ये संपादनाची कात्री आणि वृत्तपत्रीय संपादकाची चाळणी नसते. अशी चाळणी लावली जात नाही, त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे अशी चाळणी लावणे शक्यही नसते.

इतिहास बघितला तर, मुक्तपणे विचार करण्याचा, तो विचार व्यक्त करण्याचा मानवी हक्क दडपण्याचा, नाकारण्याचा प्रयत्न जगभरातल्या हुकुमशहांनी नेहमीच केल्याचे इतिहास सांगतो. दुर्दैव हे की, वर्तमानालाही त्या दडपशाहीचे नख लावण्याचे प्रयत्न चालू झाले आहेत. मुक्त विचारांचे खुले व्यासपीठ असणाऱ्या इंटरनेटवर ‘सेन्सॉरशिप’ आणण्याचा जोरदार प्रयत्न लोकशाहीचा पुरस्कार करणाऱ्या देशांमध्ये चालू झाला आहे.

भारतात एप्रिल २०११ पासून नव्याने लागू झालेल्या ‘इंटरमिडिअरी गाईडलाईन’ आणि सायबर कॅफे नियमावलीनुसार फक्त सरकारलाच नाही, तर भारतातल्या प्रत्येक नागरिकाला इंटरनेटवर नियंत्रण आणण्याची ताकद देऊ करण्यात आली आहे. हे नियम संसदेने तयार केलेले नसून माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने तयार केले आहेत, ज्यानुसार ‘तुच्छतादर्शक..’, ‘सट्टेबाजीशी संबंधित...’, ‘अल्पवयीन मुलांना कुठल्याही तऱ्हेने हानी पोहोचवणारा...’ आणि अपलोडकर्त्याकडे ज्याचा स्वामित्व हक्क नाही असा मजकूर मध्यस्थ संस्थांनी (गुगल, फेसबुक इत्यादी.) ताबडतोब काढून टाकला पाहिजे.

तुमच्या मेलबॉक्समध्ये येऊन पडलेला एखादा विनोद ‘फॉवर्ड’ करताना यापूर्वी कधी तुम्ही त्या विनोदाचा कॉपीराईट तुमच्याकडे आहे का, याचा विचार केला होता का? गेल्या काही दिवसात अनेकांनी शेअर केलेला, "IdiotKapilSibal" ही टर्म तुम्ही ट्विटरवरून शेअर केली होती? कारण अशा आशयाचा मजकूर आता ‘तुच्छतादर्शक...’ या प्रकारात मोडतो आणि नवीन कायद्यानुसार ट्विटरने असा मजकूर ताबडतोब ‘सेन्सॉर’ केला पाहिजे. काढून टाकला पाहिजे. प्लेविन लॉटरीच्या जाहिराती सिक्किम सरकार वृत्तपत्रात देऊ शकते, वृत्तपत्र त्या छापूही शकतात; पण अशा प्रकारच्या जाहिराती नवीन कायद्यानुसार यापुढे ऑनलाईन देता येणार नाहीत.

या सगळ्या गोष्टींचा अभ्यास केल्यानंतर लक्षात येते, सरकारने लागू केलेली नवीन मार्गदर्शक तत्त्वे अत्यंत सदोष आहेत. आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे ही तत्त्वे घटनाबाह्य आहेत. घटनेच्या १९(१)(अ) आणि १९(२) कलमानुसार भारतीय नागरिकांना मिळालेल्या स्वातंत्र्यावरच हा थेट घाला घालणारी आहेत.

बंगळुरू येथील आमच्या ‘सेंटर फॉर इंटरनेट ॲण्ड सोसायटी’ या संस्थेने सरकारने लादलेल्या या सेन्सॉरशिपची ताकद आजमावण्यासाठी विविध मध्यस्थ संस्थांना (म्हणजे गुगल, फेसबुक इत्यादी.) अगणित निरुपद्रवी तक्रारी पाठवल्या. सातपैकी सहा मध्यस्थांनी तातडीने आम्ही ज्याविषयी तक्रार केली होती तो, मजकूर काढून टाकला. यामध्ये ‘सर्च’ केल्यानंतर मिळणाऱ्या याद्याही होत्या. आणि या तत्पर कारवाईचे कारण काय? तर आम्ही केलेल्या चिल्लर स्वरूपाच्या क्षुल्लक तक्रारी ! ज्या लोकांचा मजकूर काढून टाकण्यात आला त्यांना तर त्याबद्दल कसलीही माहिती देण्यात आली नव्हतीच; पण सर्वसामान्य वापरकर्त्यांनाही सदर मजकूर काढून टाकला असल्याची माहिती पुरवण्यात आली नाही. आम्ही या सगळ्या गोष्टींचा माग घेत राहिलो नसतो; तर (अकारण) काढून टाकलेला मजकूर त्या त्या संकेतस्थळावर होता, हेच कदाचित विस्मरणात गेले असते.

आणीबाणीच्या काळातही अशा स्वरूपाची सेन्सॉरशिप भारतात नव्हती.

मध्यस्थ म्हणून काम करणाऱ्या इंटरनेट कंपन्यांना लागू झालेल्या नियमांनुसार तक्रारींवर कारवाई करणे आवश्यक होते कारण त्यांनी तसे केले नसते, तर इतर कुणीतरी लिहिलेल्या मजकुराबद्दल इंटरनेट कंपनीला शिक्षा भोगावी लागली असती. हे म्हणजे, ‘अ’ने ‘ब’ला लिहिलेलं आणि ‘क्ष’ला आक्षेपार्ह वाटलेले पत्र अमकीकडून तमकीकडे पोहोचवल्याबद्दल टपालखात्याला शिक्षा करण्यासारखे आहे.

सध्या तरी सरकार माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या ६९ (अ) तरतुदीनुसार सरकार आक्षेपार्ह वाटणारा मजकूर स्वतःच ‘ब्लॉक’ करू शकते. (त्याबद्दल माहिती उघड करण्यासाठी माहितीचा अधिकार वापरता येतो.) किंवा संबंधित इंटरनेट कंपनीला मजकूर काढून टाकण्याची विनंती करता येते. गुगलने नुकत्याच त्यांच्या ‘ट्रान्स्परन्सी रिपोर्ट’मध्ये सरकारकडून आलेल्या अशा विनंती –याद्यांची माहिती दिली आहे. विशिष्ट स्वरूपाचा मजकूर जाती–धर्मांमध्ये तेढ निर्माण करू शकतो हे कारण पुढे करत सिब्बल साहेबांनी सेन्सॉरशिपचा मुद्दा रेटून नेला असला, तरीही भारत सरकारकडून गुगलकडे आलेल्या अशा ३५८ प्रकरणांतील फक्त आठ तक्रारवजा विनंत्या या सामाजिक तेढ निर्माण करू शकणाऱ्या मजकुराबद्दल होत्या, तर फक्त एक तक्रार देशाच्या सुरक्षिततेला धक्का पोहोचेल अशा आक्षेपार्ह मजकुरासंबंधी होती. सरकारकडून (यात राज्य सरकारेही आलीच!) जानेवारी २०११ ते जून २०११ या कालावधीत गुगलच्या सेवांअंतर्गत केलेल्या तक्रारींपैकी उरलेली सगळी म्हणजे २५५ प्रकरणे ही सरकारवर ‘टीका’ करणारी होती, हे लक्षात घेतले पाहिजे. ज्यांमधला

→

पान १ वरून

मजकूर 'या' कायद्यांतर्गत इंटरनेटवरून काढून टाकण्यात आला. घटनेतल्या तरतुदींमुळे सरकारवरील टीकेला अटकाव करण्याचे अधिकार सरकार कडे नसले तरी गुगलने सरकारकडून आलेल्या तक्रार विनंत्यांपैकी ५१ टक्के विनंत्यांचे पालन केले आहे. याचाच अर्थ असाही होतो की, सरकारवर टीका करणारा कितीतरी मजकूर हा मजकूर लिहिणाऱ्यांच्या आणि वाचू इच्छिणाऱ्यांच्या अपरोक्ष काढून टाकण्यात आला आहे.

# मागच्या दाराने मुस्कटदाबी



इंडियाटाईम्स, फेसबुक, गुगल, याहू आणि मायक्रोसॉफ्ट अशा कितीतरी कंपन्यांवर 'स्वनियंत्रणासाठी' दबाव आणण्याचा सिब्बल यांचा ताजा प्रयत्न हा आयटी कायद्याला बगल देऊन, आडमार्गाने इंटरनेटच्या मुसक्या बांधणारी ताकद सरकारच्या मुठीत एकवटण्याचाच प्रयत्न आहे. याचा अंतर्गत हेतू इतकाच की, सरकारला जे काही 'आक्षेपार्ह' वाटेल त्या सगळ्या 'ऑनलाईन' गोष्टींवर कडक नियंत्रण असले पाहिजे. इतकेच नाही तर सिब्बल साहेब गुगलने सादर केलेल्या ट्रान्सपरन्सी रिपोर्ट सारखे सांख्यिक माहिती देणारे (आणि सरकारी बिंग फोडाणारे) अहवाल प्रसिद्ध होऊच नयेत यासाठीही कसोशीने प्रयत्न करताना दिसत आहेत.

आपापला संकेतस्थळांवर अपलोड केला जाणारा मजकूर त्या त्या इंटरनेट कंपन्यांनी स्वतःच (स्वयंस्फूर्तीने) संपादित/नियंत्रित करावा म्हणजे त्याकरता वेगळी विनंती करण्याची वेळच सरकारवर येऊ नये, स्वतःहून काही मजकूर ब्लॉक करावा लागू नये, असा सिब्बल साहेबांचा हेतू आहे.

माहिती तंत्रज्ञान खात्याकडून गुप्तपणे इंटरनेट कंपन्यांशी चर्चा चालू असल्याच्या बातम्या फुटल्यानंतर सरकारला अचानक 'पारदर्शकतेची' आणि 'संवादा'ची गरज भासली. सरकारचे हेतू खरंच चांगले आणि स्वच्छ असते, तर असे झालेच नसते.

इंटरनेट कंपन्यांवर 'स्व-नियंत्रणा'चा दबाव आणला की, वापरकर्त्यांकडून 'अपलोड' होणाऱ्या मजकुरावर आपोआपच नियंत्रण येईल आणि मग सरकारला तक्रार विनंत्या पाठवण्याची गरजच पडणार नाही, साईटस् ब्लॉक कराव्या लागणार नाहीत आणि अप्रत्यक्षपणे सरकार माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या तरतुदींमध्येही अडकणार नाही, असा सरळ सरळ हिशेब सिब्बल साहेब मांडत आहेत.

सरकारला या पद्धतीची सेन्सॉरशिप थेटपणे आणता येणे शक्य नसल्यामुळे सरकार मागच्या दारातून सगळी सूत्रे हालवत आहे. सिब्बल साहेबांनी सध्या प्रस्तावित केलेल्या कॉपीराईट कायद्याच्या सुधारणांमध्ये ५२(१)(ब) अशी एक तरतूद आहे. ज्याअंतर्गत आपल्या कॉपीराईटचे उल्लंघन केल्याबद्दल कुणीही तक्रार नोंदवू शकते. तक्रार म्हणून येणारी नोटीस खरी आहे की नाही, याची कसलीही खातरजमा न करता संबंधित मजकूर इंटरनेटवरून काढून टाकण्याचे बंधन इंटरनेट कंपनीवर असेल; अशी तरतूद या कलमात प्रस्तावित आहे. यात खोटी किंवा चेष्टेखोर नोटीस पाठवणाऱ्याला शिक्षेची तरतूद नाही. मात्र, अशी तक्रार आल्यानंतर आपल्या संकेतस्थळावरून संबंधित मजकूर तातडीने काढून टाकला नाही, तर मात्र सदर इंटरनेट कंपनीवर कारवाई होऊ शकते. याचा अर्थ कुणीही ऐरागैरा मनमानी तक्रारी करून संकेतस्थळांवरचा विशिष्ट मजकूर काढून टाकणे भाग पाडू शकतो. त्यापूर्वी स्वतःच्या हरकतीचा खरेपणा सिद्ध करण्याची कोणतीही जबाबदारी त्या ऐऱ्यागैऱ्यावर असणार नाही.

या सगळ्या घडामोडींवरून योग्य त्या प्रक्रियांना बगल देऊन इंटरनेटवरचा मजकूर काढून टाकण्याची विलक्षण घाई सरकारला झालेली दिसते आहे. सरकारला स्वतःला तर अशी बेबंद सत्ता हवीच आहे; पण त्याचबरोबर ही अनिर्बंध सत्ता सरकारला व्यक्तिगत पातळीवर नेऊन ठेवायची आहे.

याचा परिणाम काय होणार?

भौगोलिक सीमारेषा पुसून सारे जग जवळ आणणाऱ्या माहितीच्या महाजालाचा अंत.

हा मृत्यू टाळायचा असेल तर सरकारच्या अनावश्यक हस्तक्षेपाला वेळीच विरोध केलेलाच बरा !

manthan@lokmat.com